पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon Solapur-413 255 (Maharashtra)
☏: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०

◉ परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation ◉

जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/1346
Ref. No. : PAHSU/BOEE/

दिनांक :
Date : 19 JUN 2021

# परिपत्रक 38

वाचा :- प्रस्तुत विद्यापीठाचे पत्र जा. क्र. सोविसो/परीक्षा/२०१५-१६/६०२, दि. २१/०७/२०१५

प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, विद्यार्थी संबंधित महाविद्यालयाच्या कार्यालयाशी संपर्क न साधता थेट विद्यापीठ कार्यालयाकडे त्यांच्या वैयक्तिक कामानिमित्त परीक्षा विभागातील विविध विभागात येतात. उदा. परीक्षा अर्ज सादर करणे, प्रवेश पत्र दुरुस्ती, निकालातील त्रुटी, फोटो कॉपी अर्ज, पुर्नमूल्यांकन अर्ज, नावात बदल करणे, गुणपत्रिका प्राप्त न होणे व अभ्यासक्रमातील प्रश्न इ. बाबी करिता येतात.

तसेच विद्यार्थी हे उत्तरपत्रिकेची सत्यप्रत प्राप्त झाल्यानंतर त्या पूर्वीच्या मूल्यांकनाबाबत समाधान नसल्यास पुर्नमूल्यांकनासाठी अर्ज करतात. विद्यापीठ कार्यालयात अध्यादेश १०६ व त्यानुसार प्राप्त झालेल्या अर्जाच्या तक्रारी बाबत समितीसमोर ठेवून त्यांनी दिलेला निकाल हे अध्यादेश १०६ ब मध्ये नमूद केलेल्या तरतूदीनुसार अंतिम असतात. मात्र यातील बहुतांश विद्यार्थी हे पुन:श्च विद्यापीठ कार्यालयाकडे येऊन विचारणा करत असतात. यामुळे विद्यापीठ कार्यालयाचा व विद्यार्थ्यांचा नाहक वेळ वाया जात असतो. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर हे सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्ग क्र. ६५ वर असल्याने महाविद्यालय व विद्यापीठ यातील अंतर व वेळ लक्षात घेता थेट विद्यापीठाशी संपर्क न करण्यापेक्षा संबंधित महाविद्यालयातील प्राचार्यांनी आपल्या स्तरावर विद्यार्थ्यांच्या समस्या व अडचणी सोडविण्याचा प्रयत्न करावा.

तसेच जर ते प्रश्न विद्यापीठाशी संबंधित असल्यास आपल्या महाविद्यालयाच्या प्रतिनिधी मार्फत प्राचर्यांच्या शिफारशीसह विद्यापीठाकडे पाठविण्यात याव्यात. विद्यार्थ्यांना परस्पर विद्यापीठाकडे पाठवू नयेत. तसेच विद्यार्थ्यांचे अर्ज अग्रेषित करीत असताना सदर तक्रारी बाबतची आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडून महाविद्यालयाच्या प्रतिनिधी मार्फत पाठवावेत. तसेच विद्यार्थ्यांना ATKT उत्तीर्णचे नियम, पुर्न तपासणीचे व अध्यादेशाबददलचे नियमचे हे विद्यार्थ्यांना अवगत करुन द्यावेत. याबाबतचा सर्व तपशील हा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असतो. तसेच वेळोवेळी होणारे बदल ही संकेतस्थळावरिता उपलब्ध करुन दिले जातात.

तरी यापुढे विद्यार्थ्यांना विद्यापीठात शैक्षणिक कामासाठी पाठवु नये. आपल्या स्तरावर त्यांच्या अडचणी या सोडविण्याचा प्रयत्न करावा. विद्यार्थ्यांच्या निकालात व इतर बाबतीत त्रुटी असल्यास महाविद्यालयाने सोबत जोडलेल्या विविध नमुन्यातील अर्जामध्ये विद्यार्थ्यांकडुन माहिती भरुन आवश्यक ती कागदपत्रे जोडून विद्यापीठ कार्यालयास महाविद्यालयाच्या प्रतिनिधी मार्फत पाठवावे. तरी सदर बाबत संबंधित शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व पालक यांना सूचना देण्यात येऊन विद्यापीठाला सहकार्य करावे.

( डॉ. शिवकुमार गणपूर )
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रति :- प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित सर्व अभियांत्रिकी महाविद्यालये,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

Scanned with CamScanner